पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# केंद्रीय निबंधकांची 'रवळनाथ'ला एक कोटी कर्जमर्यादेस मंजुरी

## एम. एल. चौगुले यांची माहिती; कर्ज व्याजदर ८.८० टक्के

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टिस्टेट) प्रधान कार्यालय गडहिंग्लज या संस्थेस घरबांधणी आणि प्लॉट खरेदीसाठी प्रत्येकी १ कोटी तर हौसिंग व प्लॉट मॉर्गेज लोनसाठी २ कोटी ७० लाखास केंद्रीय निबंधकांनी मंजुरी दिली आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



एम. एल. चौगुले

संस्थाध्यक्ष चौगुले म्हणाले, या मंजुरीमुळे ८.८० टक्के व्याजदराने सभासदांना घरबांधणी व फ्लॅट खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे. पुणे शाखेत झालेल्या बैठकीत पुणे येथील नोकरदारांना ८०० सिबील स्कोर असल्यास ८.८० टक्के, ७५० ते ८०० स्कोर असल्यास ९ टक्के तर ७०० ते ७५० स्कोर असल्यास ९.१० टक्के व्याजदराने कर्ज देण्याचा संचालक मंडळाच्या सभेत निर्णय झाला. हा व्याजदर इतर वित्तीय संस्थापेक्षा कमी असल्यामुळे पुणे येथील सभासदांना लाभ होणार आहे. तसेच ९ टक्के व्याजदराने ५० लाखांपर्यंत मुलींना शैक्षणिक कर्ज देणारी महाराष्ट्रातील एकमेव हौसिंग फायनान्स संस्था आहे. यावेळी सीईओ डी. के. मायदेव यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.